**॥ ॐ श्री साईराम ॥**

**'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'**

**साई ज्ञानमौक्तिके**

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १७ क

चला तर आता आपण जानेवारी २००१ मधील काही घटना लक्षात घेऊ या.

**''मला तुमचे खरे रंग माहीत आहेत.''**

ते दिवस खेळांच्या सामन्यांचे होते आणि मुले रोज सकाळी खेळांचा सराव करत होती– धावणे, उड्या मारणे वगैरे.

एका सायंकाळी स्वामी मुलांना म्हणाले, ''मुलांनो, इकडे लक्ष द्या. यशस्वी होण्यासाठी दोन गोष्टींची आवश्यकता आहे. त्या गोष्टी कोणत्या? एक म्हणजे उत्साह, दुसरी म्हणजे दिलेल्या शब्दांशी बांधिलकी. यश मिळविण्यासाठी कोणालाही उत्साह आणि बांधिलकी या दोन गोष्टींची गरज असते. तुमच्याकडे बांधिलकी नसून नुसता उत्साह असून चालणार नाही, त्यांनी अपयश येईल. तुमच्याकडे फक्त बांधिलकी असून उत्साह, किंवा जोम नसेल तर ते दुहेरी अपयश होईल. म्हणून उत्साह आणि बांधिलकी हे दोन्हीही हातात हात घालून एकत्र असले पाहिजेत. हीच गोष्ट जीवनातील यशाच्या मार्गाकडे नेणारी आहे.'' नंतर ते म्हणाले, ''मुलांनो, जीवनातील कुठल्याही गोष्टीसाठी एकाग्रतेची जरूरी आहे. त्याशिवाय तुम्ही जीवनात काही मिळवू शकत नाही.''

नंतर भगवानांनी आणखी पुढे सांगितलं की जे प्रत्येकाला लागू पडते, ''तुम्ही जे काही कराल, ते दुसऱ्याला काय वाटेल याचा विचार न करता लक्षपूर्वक करा. दुसऱ्याच्या मताप्रमाणे वागू नका. जे कराल ते पूर्ण एकाग्रतेने करा. दुसऱ्यांच्या मतांकडे आणि वक्तव्याने स्वत:ला त्रास करून घेऊ नका.'' पुढे ते म्हणाले, ''एकदा का तुमच्यामध्ये अहंकाराला जागा मिळाली की तुम्ही एकाग्रता गमावता.'' सगळीकडे खेळ आणि त्याच्या स्पर्धा असतातच.

हा संदेश सर्व मुलांकरता कोण पोचवेल? तरुणांकरता कोण पोचवेल? मी तुम्हाला पूर्वी सांगितल्याप्रमाणे भगवान बाबा आपला संदेश देण्यासाठी अशा प्रत्येक प्रसंगाचा, संधीचा उपयोग करून घेतात. दुसऱ्या दिवशी त्यांनी एका मुलाकडे पाहिलं आणि म्हणाले, ''ए मुला, काल रात्री मी तुला पाहिलं. तू लाल शर्ट घातला होतास आणि उड्या मारत होतास. (हशा) मला माहीत आहे.''

त्या मुलाने बाबांकडे पाहिलं आणि म्हणाला, ''तुम्हाला कसं कळलं?''

''तुम्ही कसे रंग बदलता हे मला माहीत आहे. मला तुमचे खरे रंगसुद्धा माहीत आहेत. (हशा) कारण मी सर्वत्र असतो.''

''तुम्ही काय लिहिता ते मला माहीत असतं.''

त्याच प्रसंगाच्या वेळी दुसरा घडलेला प्रसंग मी तुमच्या लक्षात आणून देतो. तुमच्यापैकी खूप जणांनी खेळांचे सामने पाहिले असतील. सुरुवातीला खूप मोठे, भव्य बोधचिन्ह होतं; ते खाली समोर होतं. ते त्यांनी तारेच्या मदतीने टेकडीच्या माथ्यावर नेलं. तुम्ही ते पाहिलं असेलच. तुम्ही ते बोधचिन्ह पाहिलंत का? दरवर्षीच बोधचिन्ह तयार करण्यासाठी सर्व जण प्रथम खूपशी चित्रं आणि रेखाटणं घेऊन स्वामींकडे त्यांची अनुज्ञा आणि आशीर्वाद घेण्यासाठी जात. आणि त्यातील सर्वात चांगले चिन्ह निवडण्यासाठी स्वामींना विनंती करत. कृपया माझ्यावर विश्वास ठेवा– की त्याची नोंद झाली होती. कुठल्याही चित्राकडे न पाहताच स्वामी म्हणाले, ''हेच

ते, हेच ते'' त्यांनी सर्व दहा चित्रांचा उल्लेख केला! आणि दुसऱ्या कुठल्याही चित्राकडे न पाहता ते म्हणाले, ''मला पाहण्याची जरुरीच नाही. तुम्ही काढलेलं हे चित्र मला माहीत आहे. ठीक आहे. या वर्षाच्या खेळाच्या सामन्यांसाठी वाद्य हेच बोधचिन्ह असेल.''

या प्रसंगाच्या निमित्ताने मला आठवते की बंगलोरच्या राम ब्राह्मणांनी पूर्वी सांगितलं होतं. तुमच्या सर्वांच्या माहितीसाठी हे मार्गदर्शक म्हणून उपयोगी ठरेल. त्यांनी मला सांगितलं, ''श्री. अनीलकुमार, हे लक्षात घ्या की तुम्ही जेव्हा काही लिहायला लागता, त्याबद्दल स्वामींना आधीच माहिती असते. कधीही स्वामींना हे माहीत आहे का अशी शंका घेऊ नका. तुमचे पत्र स्वामींनी आधीच वाचलेले असते, याविषयीचे आश्चर्य वाटून घेऊ नका. तुम्ही तुमची लेखणी घेऊन कागदावर लिहिण्यास सुरूवात करता, तेव्हाच ते बाबांना माहीत असतं. ही अगदी सत्य गोष्ट आहे.''

हे असे प्रसंग आहेत की त्यामुळे ते काय म्हणाले याला भक्कम पुरावा होतो.

''चाचणी परीक्षा घेणं ही माझी आवड आहे.''

वृंदावनाची काही मुलं प्रशांति निलयमला आली होती. स्वामींनी मुलांना विचारलं, ''तुम्ही काय करत आहात?''

एक मुलगा म्हणाला, ''स्वामी, आमच्याकडे ग्लायडर्स (यंत्राविना उडणारे) आहेत. आम्ही उंच उडतो. समुद्रसपाटीपासून ५००० फूट उंचीवर आम्ही उड्डाण करतो.''

''ओह! तुम्ही कसे उडता?''

एक मुलगा म्हणाला, ''स्वामी, बंगलोरमध्ये याचे प्रशिक्षक आहेत. ते विद्यार्थ्यांची चाचणी घेतात, त्यांच्यातील काहींना निवडतात आणि अशा तऱ्हेने उडण्यासाठी असे खास शिक्षण देतात.'' बाबा म्हणाले, ''छान! चाचणी ही फार जरुरीची असते. अगदी आध्यात्मिक जीवनातसुद्धा अशी चाचणी परीक्षा गरजेची असते. चाचणी घेणं ही देवाची आवड आहे. चाचणी परीक्षा घेतो म्हणून कुरकुरू नका. तक्रार करू नका. उलट देवाला सांगा, ''परमेश्वरा, मी तुमच्या परीक्षेचं स्वागत करतो. कृपा करून माझी परीक्षा लवकर घे.'' (हशा) ''का? तुम्हाला वरच्या जागेवर लवकर बढती मिळावी म्हणून? मला माहीत आहे की माझी परीक्षा घेतल्याशिवाय ते शक्य होणार नाही, म्हणून चाचणी परीक्षेचं स्वागत करतो. तू ठरवलेल्या वेळेच्या आधीच माझी परीक्षा घ्यावीस अशी मी प्रार्थना करतो. तोच तुझा स्वभावविशेष असावा.''

माझ्या बुटातले पाय थरथरू लागले. (हशा) ''स्वामी, मी परीक्षेसाठी तयारी केलेली नाही. जर मागचे दार असेल तर मी त्यातून निसटायचा प्रयत्न करीन. मला परीक्षा द्यावीशी वाटत नाही.. मला परीक्षेला सामोरे जायचे नाही.'' बाबा म्हणाले, ''नाही, नाही! एक गुरु म्हणून तू तुझ्या शिष्याची परीक्षा घेत नाहीस का? तू गुण देतोस ना? रोग्याला तपासल्याशिवाय डॉक्टर औषधे लिहून देतो का? म्हणजे परीक्षेची जरुरी असतेच. तुम्ही ती टाळू शकत नाही. पुढचं दार असताना तुला मागच्या दाराने पळून जाण्याची काय जरुरी आहे? मुख्य दारानेच चालायला लाग. सुटकेचा मार्ग शोधून पळून जाऊ नकोस आणि जरी तू तसा पळालास तरी तुला वाटणारा तथाकथित फायदा तात्पुरताच आहे. काळजी घे.'' जेव्हा तो बंगलोरचा मुलगा सांगत होता की आम्ही उड्डाण करणार, समुद्रसपाटीपासून ५००० फूट उंच उड्डाण करणार, तेव्हा स्वामींनी माझ्याकडे पाहिलं.

ते म्हणाले, ''अनीलकुमार, तुला उडता येईल का?'' (हशा) ''स्वामी, मी करू शकणार नाही. मी फक्त जमिनीपासून ५०० फुटांपर्यंत उड्डाण केल्याचं आठवतं. स्वामी, त्या उंचीवर मी अगदी पूर्ण एकाग्रचित्त होऊ शकतो, पण ५००० फुटांवर नाही. त्या उंचीवर स्वामी, माझं सगळं लक्ष फक्त देवावरच असतं. (हशा) जराही डळमळीत न होणारं मन आणि ठाम श्रद्धा; पण ती सगळी उड्डाणाच्या भीतीतून निर्माण झालेली होती. (हशा)'' मग मुलाने मला निघण्याकरता विचारलं.

## ‘‘भौतिकता (ऐहिकता) ही भीतीचे कारण असते.’’

उड्डाण करताना तुम्ही दोरीने बांधलेले असता. वरच्या टोकाला छत असते आणि ३००० फूट लांबीची दोरी जीपला बांधलेली असते. जीप पुढे पुढे जात असते. झूऽऽम्... ती वेगाने धावू लागते. झूम.... झूम... मला फार वाईट वाटले. मी विचार करायला लागलो, ‘‘हे वेडपट लोक, कारणाशिवाय मला इतक्या उंचीवर उडायला का सांगत आहेत! (हशा) मी माझ्या कुटुंबाचा, मुलांचा आणि प्रत्येकाचा विचार करू लागलो. (हशा) जीपमधल्या माणसाला माझ्या भावना कळल्या असाव्यात. त्यानं मला सांगितलं, ‘‘ते टोक इतकं घट्ट पकडू नका. इतकं घट्ट नको. जरा मोकळं सोडा. काहीही होणार नाही.‘‘ तरीही मी ते टोक घट्ट पकडून ठेवलं होतं. (हशा) इतक्या दुरून त्यानं माझ्या भावना ओळखल्या. म्हणून त्यानं जीपचा वेग कमी केला आणि मला सुखरूपपणे जमिनीवर उतरवलं. मी स्वामींना सांगितलं, ‘‘आता हे पुरे झालं. मला आता आणखी काही नको.’’ (हशा) ते म्हणाले, ‘‘हे बघ, तू म्हणालास की तुझं डोकं गरगरू लागलं. जर तुझा विश्वास आणि खरी भक्ती असती तर तसं झालं नसतं.’’

‘‘स्वामी, माझा इलाजच नव्हता. मला त्याच्यातून मोकळं करा. इतकंच.’’ (हशा) स्वामी म्हणाले, ‘‘ऐहिक गोष्टीची भीती ह्याला जबाबदार असते. समजलं! त्या मुलाकडे पाहा. तो ५००० फुटांवर सहजपणे उडू शकतो. का? गेली कित्येक वर्षं तो माझ्या सहवासात आहे. तो कधीच घरी गेलेला नाही. त्यामुळे इतक्या उंच उडायला त्याला धैर्य आणि सामर्थ्य मिळालंय. त्याला चांगलंच माहीत होतं की स्वामी त्याच्या जवळच आहेत आणि काहीही चुकीचं घडणार नाही.’’

‘‘ओ, ओ.के. हे त्या मुलाच्या बाबतीत खरं आहे, पण माझ्या बाबतीत नाही.’’ (हशा)

‘‘सावकाश सुरूवात करा आणि नंतर हळूहळू वेग घ्या.’’

मग स्वामी प्रशांतीनिलयम्च्या विद्यार्थ्यांकडे वळले आणि त्यांना सांगितलं, ‘‘मुलांनो, मी तुम्हाला मोटर-सायकलवर पाहिलं. मी तुम्हाला एक महत्त्वाचा नियम सांगतो. स्वामींना मोटरसायकलची माहिती आहे. मला हे समजण्याकरता मोटरसायकलवर फिरावं लागलं नाही. मी तुम्हाला एक गुपित सांगतो. सुरुवातीला तुम्ही वेगाने सुरुवात करता आणि शेवटी वेग कमी करता. असे करायचे नसते. मोटरसायकलची शर्यत जिंकण्यासाठी सुरुवातीला तुम्ही सावकाश जा, नंतर तुम्ही वेगाने जा.’’ स्वामी, मुलांनी शर्यतीत जिंकावं म्हणून काही राहून जाणारी जास्तीची माहिती देत होते.

मग स्वामी म्हणाले, ‘‘मुलांनो, इकडे लक्ष द्या. माझ्या शालेय दिवसात मी धावण्याच्या शर्यतीत पहिला येत असे. माझे स्पर्धक कोण असायचे? मोठीं मुलं, माझ्यापेक्षा खूप उंच मुलं; तरी मी पहिला यायचो. तुम्हाला माहीत आहे का का ते? सुरुवातीला ती मुलं खूप वेगाने पळण्यास सुरुवात करीत, मग ती दमायला लागायची आणि श्वासासाठी धापा टाकू लागायची. दुसरीकडे, मी सावकाश सुरूवात करायचो, मग वेग घ्यायचो आणि पहिला येत असे. ही जिंकण्याची गुपिते आहेत.’’ भगवान जुन्या आठवणींना उजाळा देण्याच्या लहरीत होते. ‘‘मुलांनो, मी जेव्हा कंपालात होतो, (स्वामी आफ्रिकेला भेट दिल्याचे तुम्हाला माहीत आहे) मी आपल्या लांब लांब पायांनी भरभर चालणारे खूप जिराफ पाहिले आहेत. जिराफ एखाद्या गाडीपेक्षा जलद चालू शकतात. झेब्रा मात्र खूप सावकाश चालतो. तुम्ही झेब्रा नाहीत. तुम्ही जिराफासारखं असायला हवं.’’

***